# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

**(गृह शाखा)**

**दुरध्वनी क्रमांक** - 0217- 2731020 **ई मेल** - dcbsolapur@gmail.com

---

वाचा :- १) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. ४.४.२०२१, दि. ५.४.२०२१, दि.८.४.२०२१, दि. ९.४.२०२१,

२) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दि. ५.४.२०२१, ०६.०४.२०२१

३) या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दि.०८.०४.२०२१

४) भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

५) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

६) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

---

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/१७३५ दिनांक :- १०/०४/२०२१

**विषय :- फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

**<u>आदेश :-</u>**

ज्याअर्थी, कोव्हीड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये निर्गमीत केलेले प्रतिबंधात्मक निर्देश या कार्यालयाचे वाचा क्रं. २ अन्वये सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) लागु करण्यात आले आहेत. यामध्ये शासनाकडून दिनांक ०९.०४.२०२१ च्या पत्रान्वये खालील नमुद निकषाचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोव्हीड-१९ चे मोठया प्रमाणात वाढत असलेल्या रुग्ण संख्येवर आळा घालण्यासाठी या कार्यालयाच्या वाचा क्र. २ दिनांक ०५.०४.२०२१ व ०६.०४.२०२१ अन्वये जारी केलेल्या मनाई आदेशात खालील मुद्याचा समावेश करीत आहे.

१. खाजगी व सार्वजनिक वाहतूक, चित्रपट व मालिकांचे चित्रीकरण, जाहिराती, होम डिलीव्हरी सर्व्हिसेसशी संबंधीत कर्मचारी, परीक्षा घेणारे कर्मचारी, लग्नाच्या ठिकाणचे कर्मचारी, अंत्यसंस्कार स्थळावरील कर्मचारी, खाद्य विक्रेते, कामगार/ उत्पादन क्षेत्रीतील कर्मचारी, ई कॉमर्स कर्मचारी , परवानगी असलेल्या बांधकाम कार्यात सहभागी असलेले कर्मचारी, आरबीआय किंवा वित्तीय इतर संस्था यामधील कर्मचा-यांना लसीकरण न झाल्यास, कोरोना निरोना निगेटिव्ह असलेबाबत १५ दिवस वैध असलेले प्रमाणपत्र बाळगण्याची उपरोक्त आदेशात तरतूद आहे. आता

Scanned with CamScanner

RTPCR चाचणीला एक पर्याय म्हणून रॅपीड अ‍ॅन्टजेन टेस्टला परवानगी दिली जात आहे. हा नियम १०.०४.२०२१ पासून अमंलात येईल.

२. आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र, सेतु सुविधा केंद्र, पासपोर्ट सेवा केंद्र इत्यादी जे विविध शासकीय सेवेसाठी एक खिडकी योजना अंतर्गत सेवा पुरवितात ते केंद्र सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

३. "वर्तमानपत्रे" या संज्ञेमध्ये मासिके, जर्नल्स आणि नियतकालिके यांचा समावेश राहील.

सदरचा आदेश दि. १०.०४.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

**प्रत– माहितीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत – आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलिस आयुक्त सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्ठाता,डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकिय महाविद्यालय सोलापूर.
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, सोलापूर
७. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
८. सर्व उपविभागीय दंडाधिकारी ---------------
९. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर
१०. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------
११. जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर
१२. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिध्दीस्तव.
१३. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

E:\E DRIVE\DCB-2\2019-2020\Corona

Scanned with CamScan